नवमो पाढो

९ अरिउत्तो परकेरओ संवुत्तो

अभिजात संस्कृत प्राकृत नाटककारांमध्ये अग्रपूजेचा मान 'भास' नाटककाराकडे जातो. ते भगवान महावीर आणि भगवान गौतमबुद्धांच्यानंतर आणि 'कविकुलगुरु कालीदासा'च्या अगोदर होऊन गेले असावेत. भासाच्या पाच एकांकिका साहित्यिक दृष्टीने अप्रतिम आहेत. त्याखेरीज त्याने प्रतिमा, अभिषेक, पञ्चरात्र आदि अनेक नाटकेही लिहिली. त्यापैकी 'प्रतिज्ञायौगन्धरायणम्' आणि स्वप्नवासवदत्तम्' ही नाटके कथानकाच्या दृष्टीने पाठोपाठ लिहिलेली आहेत. त्यातही 'स्वप्नवासवदत्तम्' हे सहा अंकांचे नाटक, त्याची सर्वश्रेष्ठ नाट्यकृती मानली जाते.

प्रस्तुत पाठातील नाट्य-उतारा 'स्वप्नवासवदत्तम्' नाटकातील तिसरा अंक आहे. हा अंक त्यामानाने छोटा असल्याने संपूर्ण घेतला आहे.

उज्जयिनीचा राजा उदयन, प्रद्योतराजाच्या कन्येचे-वासवदत्तेचे अपहरण करून उज्जयिनीस आणतो. अर्थात् वीणावादनाच्या निमित्ताने ते दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलेले असतातच. विवाहानंतर वासवदत्तेच्या प्रेमात आकंठ बुडालेला राजा, राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करू लागतो. परिणामी त्याचा प्रदेश शत्रुराजा जिंकून घेतो. उदयनाचा मंत्री 'यौगन्धरायण' मोठ्या कौशल्याने एक युक्ती योजतो. मगधराजाची पुत्री 'पद्मावती'-हिचा विवाह उदयनाशी घडून आल्यास, पराक्रमी मगधराजाच्या मदतीने राज्यही परत मिळणार असते आणि वासवदत्तेच्या प्रेमातूनही उदयन बाहेर येणार असतो.

यौगन्धरायणास माहीत असते की वासवदत्तेला दूर केल्याशिवाय हे कदापीही शक्य नाही. उदयन शिकारीला गेल्यावर तो वासवदत्तेला घेऊन बाहेर पडतो. तिला सर्व योजना समजावतो. 'ते दोघे अग्नीत भस्मसात झाले', अशी वदंता पसरवितो. उदयन शोकाकुल होतो. त्याचवेळी यौगन्धरायण वासवदत्तेसह मगधदेशास जातो. मगधराजाशी उदयन – पद्मावतीच्या विवाहाची बोलणी करतो. वासवदत्तेविषयीचे सर्व लोकापवाद टाळण्यासाठी, एका चारित्र्यसंपन्न तापसीच्या मदतीने, वासवदत्तेला पद्मावती राजकन्येकडेच 'ठेव' (न्यास) म्हणून ठेवतो. ती राजकन्येच्या अंत:पुरात राहू लागते.

वासवदत्तेच्या तेथील वास्तव्यातच उदयन-पद्मावतीची विवाहघटिका जवळ येते. विवाहमाला गुंफण्याची कामगिरी वासवदत्तेवर येते. त्यावेळी, सर्व काही योजना माहीत असूनही, वासवदत्तेच्या मनात भावनांचे कल्लोळ उमटतात. त्याचे चित्रीकरण प्रस्तुत उताऱ्यात केले आहे. 'अय्यउत्तो परकेरओ संवुत्तो'-या शीर्षकाचा अर्थ आहे – 'आर्यपुत्र (माझे पती) (आता) परके झाले.'

प्रस्तुत उताऱ्यातील संभाषण 'शौरसेनी' प्राकृत भाषेत आहे. या उताऱ्यातील सर्व रंगसूचना संस्कृत भाषेत आहेत.

(तत: प्रविशति विचिन्तयन्ती वासवदत्ता ।)

वासवदत्ता – विवाहामोदसंकुले अंतेउरचउस्साले परित्तजिअ पदुमावदिं इह आअदम्हि पमदवणं । जाव दाणिं भाअधेअणिव्वुत्तं दुक्खं विणोदेमि । (परिक्रम्य) अहो अच्चाहिदं ! अय्यउत्तो वि णाम परकेरओ संवुत्तो । जा उवविसामि । (उपविश्य) अय्यउत्तं पेक्खामि त्ति एदिणा मणोरहेण जीवामि मंदभाआ ।

(तत: प्रविशति पुष्पाणि गृहीत्वा चेटी)

चेटी – कहिं णु खु गदा अय्या आवंतिआ ? (परिक्रम्य अवलोक्य) अम्मो ! इयं चिंतासुण्णहिअआ अमंडिद-भद्दवेसं धारअंदी अंबरुक्खसिलापट्टए उवविट्ठा । जाव उवसप्पामि (उपसृत्य) अय्ये आवंतिए ! को कालो तुमं अण्णेसमि ।

वासवदत्ता – किं णिमित्तं ?

चेटी – अम्हाणं भट्टिणी भणादि महाकुलप्पसूदा सिणिद्धा णिउणा त्ति इमं दाव कोदुअमालिअं गुम्हदु अय्या।

वासवदत्ता – अह कस्स किल गुम्हिदव्वं ?

चेटी – अम्हाअं भट्टिदारिआए ।

वासवदत्ता (आत्मगतम्) – एदं पि मए कत्तव्वं आसी । अहो अकरुणा खु इस्सरा ।

चेटी – अय्ये ! मा दाणिं अण्णं चिंतिअ ! एसो जामादुओ मणिभूमिए ण्हाअदि । सिग्घं दाव गुम्हदु अय्या । (आर्ये ! मा इदानीं अन्यत् चिन्तयित्वा । एष जामाता मणिभूम्यां स्नायति । शीघ्रं तावद गुम्फत्वार्या।)

वासवदत्ता (आत्मगतम्) – न सक्कुणोमि अण्णं चिंतेदुं । (प्रकाशम्) हला ! किं दिट्ठो जामादुओ ?

चेटी – आम्, दिट्ठो भट्टिदारिआए सिणेहेण अम्हाअं कोदूहलेण अ ।

वासवदत्ता – कीदिसो जामादुओ? (कीदृशो जामाता?)

चेटी – अय्ये ! भणामि दाव, ण ईरिसो दिट्ठपुरुवो । सक्कं भणिदुं सक्खं कामदेवो त्ति । (शक्यं भणितुं साक्षात् कामदेव इति ।)

वासवदत्ता – होदु एत्तअं ।

चेटी – किण्णिमित्तं वारेसि ?

वासवदत्ता – अजुत्तं परपुरुससंकित्तणं सोदुं ।

चेटी – तेण हि गुम्हदु अय्या सिग्घं ।

वासवदत्ता – इअं गुम्हामि । आणहि दाव ।

चेटी – गेण्हदु अय्या ।

वासवदत्ता – (एकां ओषधिं वर्जयित्वा विलोक्य) इमं दाव ओसहिं किं णामा?

चेटी – अविहवाकरणं णाम।

वासवदत्ता (आत्मगतम्) – इदं बहुसो गुम्हिदव्वं मम अ पदुमावदीए अ। (प्रकाशम्) इमं दाव ओसहिं किं णामा?

चेटी – सवत्तिमद्दणं णामा ।

वासवदत्ता – इदं ण गुम्हिदव्वं ।

चेटी – कीस ?

वासवदत्ता – उवरदा तस्स भज्जा, तं णिप्पओअणं त्ति ।

(प्रविश्य अपरा)

चेटी – तुवरदु तुवरदु अय्या । एसो जामादुओ अब्भंतरचदुस्सालं पवेसीअदि ।

वासवदत्ता – अइ ! वदामि, गेण्ह एदं ।

चेटी – सोहणं अय्ये ! गच्छामि दाव अहं ।

वासवदत्ता – गदा एसा । अहो ! अय्यउत्तो वि णाम परकेरओ संवुत्तो । अविदा सय्याए मम दुक्खं विणोदेमि जदि णिद्दं लभामि ।

शब्दार्थ व टीपा

विवाहामोदसंकुले (संधि) – विवाह+आमोदसंकुले । विवाहाच्या हर्षाने युक्त.
चउस्साले – चौकात, प्रांगणात.
पदुमावदी – 'पद्मावती', मगध राजकन्येचे नाव.
पमदवणं – प्रमदवन, उद्यान, बगीचा.
भाअधेअणिव्वुत्तं दुक्खं – नशिबाने प्राप्त झालेले दु:ख.
विणोदेमि – हलके करीन, दूर करीन.
परिक्रम्य – ही रंगसूचना आहे. वळून, आजूबाजूला नजर टाकून.
अच्चाहिदं – 'अरेरे !' असे दु:खोद्‌गार.
चेटी – अंत:पुरातील दासी.
अय्या – आर्या.
आवंतिआ – 'आवंतिका', वासवदत्तेचे अज्ञातवासातील नाव.
अमंडिद–भद्दवेसं–धारअंदी – अलंकार धारण न केलेली आणि साधा वेष धारण केलेली.
अंबरुक्खसिलापट्टए – आम्रवृक्षाखालील शिलातलावर, पारावर.
अण्णेसामि (क्रि.) – 'अण्णेस', वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, शोध घेते.
भट्टिणी – स्वामिनी.
सिणिद्धा – स्निग्ध, मायाळू.
कोदुअमालिआ – कौतुकमालिका, शुभसूचक वरमाला.
गुम्ह (क्रि.) – गुंफणे.
भट्टिदारिआ – भर्तृदारिका, स्वामीची कन्या, बाईसाहेब.
जामादुओ मणिभूमिए ण्हाअदि – जावई रत्नखचित स्नानगृहात स्नान करीत आहे.
दिट्ठपुरुवो – दृष्टपूर्व, पूर्वी कधी न पाहिलेला.
सक्खं (अ.) – साक्षात्, प्रत्यक्ष.
किण्णिमित्तं वारेसि ? – का म्हणून निवारण करीत आहेत, अडवीत आहेस ?
ओसहि (स्त्री.) – ओषधि, विशेष गुणांनी युक्त अशी वनस्पती.
अविहवाकरण – अविधवाकरण अर्थात् सौभाग्य प्रदान करणारी वनस्पती.
सवत्तिमद्दण – सपत्नीमर्दन अर्थात् सवतीचा नाश करणारी वनस्पती.
उवरदा (क्रि.) – 'उव+रम', क. भू. धा. वि., स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन, मरण पावली.
भज्जा – भार्या, पत्नी.
तुवरदु तुवरदु – त्वरा करा, घाई करा.
अविदा – हाय ! अरेरे !
सय्याए मम दुक्खं विणोदेमि – जरा अंथरूणावर पडून दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करते.

स्वाध्याय

प्र. १ : थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) संस्कृत नाटककारांमध्ये भासाचे स्थान कोणते आहे ?
(२) भासांच्या कोणत्याही तीन नाटकांची नावे लिहा.
(३) वासवदत्तेची मानसिक स्थिती कोणत्या प्रसंगामुळे बिघडलेली आहे ?

प्र. २ : व्याकरण

पुढील शब्दांना उताऱ्यात आलेले प्राकृत प्रतिशब्द लिहा.

आमोद, पद्मावती, आर्यपुत्र, वेष, कौतुकमालिका, जामातृक, दर्शनीय, निष्प्रयोजन, चतु:शाल, शोभन, शय्या, निद्रा.

विशेष अभ्यास

पुढील पाच वाक्यांचा प्राकृतात अनुवाद करा.

(१) भास कवीने 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक लिहिले.
(२) 'वासवदत्ता' ही प्रद्योत राजाची मुलगी होती.
(३) मंत्र्याने वासवदत्तेला 'आवन्तिका' असे नाव दिले.
(४) उदयन राजा मगधाच्या राजाचा जावई झाला.
(५) उदयनाच्या दुसऱ्या विवाहाने वासवदत्ता दु:खी झाली.

❑ ❑ ❑